# देगलूर महाविद्यालयात स्पर्धा परीक्षेचा समारोप

देगलूर, ता.११ (बातमीदार) : प्रा. उत्तमकुमार कांबळे मित्र परिवारातर्फे महात्मा ज्योतिबा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संयुक्तिक जयंतीनिमित्त देगलूर महाविद्यालयात खुली स्पर्धा परिक्षा आयोजित करण्यात आली होती.

रविवारी (ता.१०) रोजी आयोजित या स्पर्धेत २१३ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये केंद्रीय लोकसेवा आयोग व महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या बाबतीत असलेला न्यूनगंड कमी व्हावा व त्या परीक्षेत ग्रामीण भागातील विद्यार्थी यशस्वी व्हावेत यासाठी ही स्पर्धा परीक्षा आयोजना मागचा मंडळाचा प्रामाणिक हेतू असल्याचे प्रा. उत्तमकुमार कांबळे यांनी प्रास्ताविकात सांगितले. स्पर्धा परीक्षेस बसणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रा. डॉ. शेरीकर, प्रा. डॉ. सुदाम, प्रा. डॉ. कंधारे, प्रा.लझडे, डॉ. चोले, प्रा. बाकेवाड, प्रा. रणखांब, प्रा. भालेकर, प्रा. भुरे, दोंतुलवाड, मिरलवार, मंगरूळे, प्रा. डॉ. गायकवाड, किशनराव पांचाळ, प्रा. डॉ. गुजे, प्रा. संग्राम पाटील, प्रा. दत्ता पाटील यांच्यासह इतरांनी मार्गदर्शन केले.

परीक्षा यशस्वी करण्यासाठी मित्रमंडळाचे विकास नरबागे, अनिल हसनाळकर, शैलेश भुताळे, विकास देगलुरकर, किरण कांबळे, बालाजी कांबळे, रामेश्वर कंधारे, संतोष पद्मवार यांच्यासह इतर सदस्यांनी परिश्रम घेतले. या उपक्रमाबद्दल अडत व्यापारी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्रकाश पाटील बेंबरेकर, प्राचार्य डॉ. मोहन खताळ, उपप्राचार्य गोविंदवार, प्रा. सर्जेराव रणखांब यांच्यासह अनेकांनी कौतुक केले. शेवटी उपस्थितांचे आभार विशाल बोरगावकर यांनी मानले.



देगलूर : देगलूर महाविद्यालयात स्पर्धा परीक्षेचा समारोप घेण्यात आला.